# हमीपत्र
## (वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालय)

मी (पालक) ________________________________ आपल्या संस्थेत माझा

पाल्य कुमार/कुमारी __________________________________ याने प्रथम

/ द्वितीय / तृतीय वर्षामध्ये आर्टस / कॉमर्स या शाखेत प्रवेश घेतला आहे. खाली दिलेले सर्व नियम व अटी मान्य असून त्या नियम अटी याचे पालन माझ्या पाल्याकडून न झाल्यास माझ्या पाल्याचा प्रवेश रद्द होईल तसेच होणा-या सर्व नुकसानीस मी व माझा पाल्य जबाबदार राहील.

## नियम व अटी

| | |
|---|---|
| 1 | विद्यार्थ्यांना महाविद्यालय परिसरात मोबाईल वापरणेस सक्त मनाई आहे. कृपया पालकांनी/विद्यार्थ्यांनी याबाबत विशेष दक्षता घ्यावी या नियमाचे उल्लंघन केल्यास मोबाईल जप्त करणेत येईल व तो परत केला जाणार नाही याची पालक व पाल्य या नात्याने आम्हास जाणीव आहे व ते मान्य आहे. |
| 2 | जे विद्यार्थी दुचाकी वाहनाने महाविद्यालयात ये जा करणार आहेत, अशा विद्यार्थ्यांचे ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक आहे व सुरक्षिततेच्या दृष्टीने हेल्मेट वापरणे  बंधनकारक आहे. तसेच दुचाकी वाहन कॉलेज आवारामध्ये पार्किंग करणे बंधनकारक आहे. तथापी बाहेर पाकींग केलेस वाहन मोडतोड/चोरी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आमची (पालक व पाल्य) आहे. |

| | |
|---|---|
| 3 | सर्व विद्यार्थ्यानी पूर्ण वेळ महाविद्यालयात थांबणे बंधनकारक आहे. सर्व तासांना हजर असणे बंधनकारक आहे. |
| 4 | जर मी अल्पसंख्याक असेन आणि मला अल्पसंख्याक स्कॉलरशिप चा लाभ घ्यावयाचा असेल तर ऑनलाईन अल्पसंख्याक स्कॉलरशिपचा फॉर्म www.dte.org.in/minority या संकेतस्थळावर मी स्वत:भरणे अत्यंत आवश्यक आहे.व तो भरलेला स्कॉलरशिपचा ऑनलाईन फॉर्म आवश्यक कागदपत्रासह ऑफिसमध्ये वेळेत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा होणा-या नुकसानीस मी स्वत: जबाबदार राहीन अन्यथा संपूर्ण शुल्क भरावे लागेल याची मला जाणीव संस्थेने करून दिलेली आहे. व मला मान्य आहे. तसेच त्या वेळी नियामानुसार ईबीसी फॉर्म भरता येणार नाही. |
| 05 | जरी मी राखीव प्रवर्गातून प्रवेश घेतला असेन आणि मला ई स्कॉलरशिपचा SC/ST/VJNT/OBC/SBC लाभ घ्यावयाचा असेल तर ऑनलाईन ई स्कॉलरशिपचा फॉर्म www.maheschool.gov.in तसेच EBC- www.ebc.dhemaharashtra.in या संकेतस्थळावर स्वत: भरणे अत्यंत आवश्यक आहे व तो भरलेला स्कॉलरशिपचा व ईबीसीचा ऑनलाईन फॉर्म आवश्यक कागदपत्रासह ऑफिसमध्ये फॉर्म भरले पासून 10 दिवसाच्या आत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा होणा-या नुकसानीस मी स्वत: जबाबदार राहिन व ऑनलाईन फॉर्म भरला नाही तर संपुर्ण शुल्क भरणेची जाणीव मला संस्थेने करून दिलेली आहे ती मला मान्य आहे. |
| 06 | विद्यार्थी एका शैक्षणिक वर्षामध्ये एकाच स्कॉलरशिपचा लाभ घेवू शकतो |

| | |
|---|---|
| | त्यामुळे व विद्यार्थी व पालकाने कोणत्याही एकाच स्कॉलरशिपचा लाभ घेणेचा आहे. जर एखाद्या विद्यार्थ्याने एकापेक्षा जास्त स्कॉलरशिप घेतल्याचे आढळल्यास एक स्कॉलरशिप शासनाकडे परत करण्यासाठी कॉलेजकडे जमा करावी लागेल व होणा-या कारवाईस विद्यार्थी व पालक जबाबदार राहतील याची आम्हाला पूर्ण कल्पना आहे. |
| 07 | कोणतीही स्कॉलरशिप मिळण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यास शासनाचे निर्देश केलेले कागदपत्रे व दाखले आवश्यक असल्याची मला पूर्ण कल्पना आहे. सदरची कागदपत्रे व दाखले मी माझ्या जबाबदारीने सादर करण्याची हमी देत आहे. तसेच कोणत्याही स्कॉलरशिपसाठी बॅक ऑफ इंडिया, पटेल चौक शाखा, सांगली मध्ये विद्याथ्याचे नांवे खाते असणे आवश्यक आहे. तसेच बॅक खात्याशी आधार कार्ड संलग्नीकृत याची पूर्तता आम्ही करीत आहोत. |
| 08 | विद्यार्थी दररोज महाविद्यालयात हजर असणे आवश्यक आहे. तसेच विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे विद्यार्थ्याची प्रत्येक सत्रसाठी 80टक्के पेक्षा कमी हजेरी असल्यास तो/ती विद्यार्थी/विद्यार्थीनी परीक्षेस बसणेस अपात्र ठरतो/ठरते याची आम्हाला कल्पना आहे. |
| 09 | विद्यार्थी जर एखादा दिवस हजर राहणार नसेल तर विद्यार्थ्याने संबंधीत वर्ग शिक्षकांची तसेच विभाग प्रमुखांची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे. |
| 10 | विद्यार्थ्याने महाविद्यालया  परिसर स्वच्छ राखणे आवश्यक आहे. त्यासाठी विद्यार्थ्याने कोणत्याही प्रकारचे अंमली पदार्थ,तंबाखू, गुटखा, सिगारेट, च्युईगम, इ. आरोग्यास अपायकारक पदार्थ जवळ बाळगणे अथवा खाणेस सक्त |

| | |
|---|---|
| | मनाई आहे. जर आढळल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल. |
| 11 | विद्यार्थ्याजवळ दररोज महाविद्यालयाचे ओळखपत्र असणे बंधनकारक आहे. अन्यथा विद्यार्थ्यास महाविद्यालयात प्रवेश दिला जाणार नाही. ओळखपत्र हरविल्यास 100 रूपये दंड आकारला जाईल. |
| 12 | विद्यार्थ्याकरीता वेळोवेळी महत्वाच्या सुचना या सूचना फलकात प्रदर्शित केल्या जातील त्या पाहणे विद्यार्थ्यासाठी आवश्यक व महत्वाच्या आहेत. विद्यार्थ्यानी 'मला माहीत नव्हते'. असे नमुद करू नये. |
| 13 | पालकांनी वरचेवर आपल्या पाल्याची अभ्यासातील प्रगती संबधीत विषय शिक्षक व विभागप्रमुख यांना समक्ष भेटून अवगत करून घ्यावी. |
| 14 | लायब्ररीची पुस्तके वेळेत जमा करणे बंधनकारक आहे. जर वेळेत जमा केली नाहीत तर जो दंड देय आहे, तो भरावा लागेल. |
| 15 | कॉलेजच्या सर्व स्टाफशी मी नम्रतापूर्वक वर्तणूक ठेवीन |
| 16 | संस्थेच्या मालमत्तेची मोडतोड होणार नाही. याची मी खबरदारी घेईन अन्यथा अशा कोणत्याही प्रकारच्या बाबीमध्ये कॉलेज प्रशासन जो दंड आकारेल अथवा केला जाईल तो भरण्यास आम्ही तयार आहोत. |
| 17 | जे विद्यार्थी कॉलेजमधील बेचेंस भिंतीवर, टॉयलेमध्ये लिहिताना आढळतील अशा विद्यार्थ्यावर कडक कारवाई करून त्याचा प्रवेश रद्द केला जाईल. |
| 18 | सर्व साहित्य आपापल्या जबाबदारीवर ठेवणेचे आहे. आपल्या काही वस्तू, मोबाईल हरवल्यास कोणतीही तक्रार ऐेकली जाणार नाही. आपली सॅक |

| | |
|---|---|
| | वर्गामध्ये ठेऊन पाणी पिण्यास अथवा इतर कामास जाऊ नये व हरवल्यास कोणतीही तक्रार आम्ही करणार नाही |
| 19 | दरवर्षी प्रवेश घेतेवेळी सुरवातीलाच शासकीय नियमाप्रमाणे एकरकमी पूर्ण फी भरण्याची आम्ही हमी देतो. जर फी भरणेस प्रशासनाकडून मुभा दिली असेल तर त्या वर्षाचा परीक्षेचा फॉर्म भरणेपूर्वी पूर्ण फी भरणेचे अभिवचन या द्वारे देत आहोत. |
| 20 | ऍन्टी रॅगींग चे हमी पत्र Affidevit त्वरीत देणेची हमी देतो अन्यथा होणा-या नुकसानीस स्वत: जबाबदार राहीन याची मला जाणीव आहे. याची कल्पना असूनही काही चूका झाल्यास प्रवेश रद्द केला जाईल व तो आम्हाला मान्य असेल या बाबत कोणतीही तक्रार असणार नाही. |
| 21 | महाविद्यालयामध्ये दैनंदिन कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी असणा-या नियमांशी मी व पाल्य सदैव बांधिल असेन तसेच वेळोवेळी नियमात बदल झाल्यास विद्यार्थ्यांनी नियम पाळणे आवश्यक आहे. |
| 22 | महाविद्यालयास विद्यार्थ्याचा कायम पत्ता व मोबाईल नंबर बरोबर देणे अनिवार्य आहे अन्यथा होणा-या नुकसानीस मी स्वत: जबाबदार राहीन याची मला कल्पना आहे. |

**प्रवेश प्रक्रियेसाठी व स्कॉलरशिप/ईबीसी साठी लागणारी सर्व कागदपत्रे व दाखले विहीत कालावधीत उपलब्ध करून देणे मला बंनधनकारक आहे. याची मला कल्पना आहे. अन्यथा मला महाविद्यालयाची पूर्ण फी भरावी लागेल याची प्रशासनाकडून कल्पना दिली आहे.**

वरील सर्व नियम व अटी मी व माझ्या पाल्याने पूर्ण वाचलेले आहेत. व ते आम्हास मान्य व कबुल आहेत.

| विद्यार्थी नांव सही | पालकांची नांव सही |
| --- | --- |
| नांव :________________________ | नांव :________________________ |
| सही :________________________ | सही :________________________ |
| मोबाईल नंबर :_________________ | मोबाईल नंबर :_________________ |